**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा**
महाराष्ट्र राज्य, पुणे-**१**,जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२४८१५ / फॅक्स क्रमांक ०२०/२६१२५८७८
Email- igoffice.est2-mh@gov.in

**प्रति,** 685 **ई-मेल/कारागृह वेब साईट**

विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, मुंबई
कारागृह उपमहानिरीक्षक **(सर्व)**
प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगअधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे
**(सर्व)** अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा/खुले/महिला-कारागृह,खुली वसाहत/
प्राचार्य, किशोर सुधारालय,नाशिक

जाक्र.कार्यकारी/तुअश्रेणी-१/अंतिमज्येसूजाने२०१८/क-२/२०१९ पुणे दि21/०१/२०१९

विषय : कारागृह विभागातील तुरुंगअधिकारी श्रेणी-१ (अराजपत्रित गट-ब ) संवर्गाची दि.०१/०१/२०१८ ची अंतीम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ : १) शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एसआरव्ही २०११ दिनांक २१/१०/२०११.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र. कार्यकारी/तुअश्रेणी-१/तासेजेसु१जाने२०१८ क-२/२०१८/१०९९०, दिनांक २०/११/२०१८.

कारागृह विभागातील तुरुंगधिकारी श्रेणी-१(अराजपत्रित गट-ब) संवर्गाची दिनांक ०१/०१/२०१८ ची तात्पुरती ज्येष्ठता सूची संदर्भ क्र. २ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीबाबत काही तुरुंगअधिकारी श्रेणी-१ यांनी नोंदविलेल्या आक्षेपानुसार सदर अधिका-यांना प्रत्यक्ष समिती समोर उपस्थित म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली होती त्याप्रमाणे मुख्यालयस्तरावर गठीत केलेल्या समितीने याबाबत विस्तृत चर्चा करुन संबंधीतांच्या आक्षेपाची पुर्तता केलेली असून याबाबत त्यांना लेखी कळविण्यात आलेले आहे.

वरील शिवाय श्री. हरिश्चंद्र श्रीरंग जाधवर, तुरुंगअधिकारी श्रेणी-१ यांनी दिलेले निवेदन व कागदपत्राच्या अनुषंगाने त्यांचा ज्येष्ठता अ.क्र. १५ ऐवजी अ.क्र. ९ वर निश्चित करण्यात आलेली आहे.

तुरुंगअधिकारी श्रेणी-१ यांची संदर्भ क्र. २ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीवरील आक्षेप, त्रुटी व सेवानिवृत्त झालेले अधिकारी इत्यादी बाबी विचारात घेऊन त्यानुसार सुधारीत नोंदी घेण्यात येऊन त्याप्रमाणे दि. ०१ जानेवारी, २०१८ रोजीची ज्येष्ठता अंतिम करण्यात येत आहे. तसेच या पुढील आक्षेप व निवेदने विचारात घेतले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठता सूची सर्व संबंधीत तुरुंगअधिकारी श्रेणी-१ यांचे निदर्शनास तात्काळ आणावी व पुर्तता अहवाल सादर करावा.

कारागृह विभागाचे वेबसाईट www.mahaprisons.gov.in वर सदरील ज्येष्ठतासूची उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(मा.अ.पो.म.सं. व का.म.नि. यांचे मान्यतेने)

V Madh 19-1-19

**( डॉ विठ्ठल जाधव )**
**विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय)**
**कारागृह व सुधारसेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत** : कक्ष अधिकारी, कक्ष क्रमांक १३ (ई-सेल), अपोमसं व कामनि कार्यालय, पुणे यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२/- सदरची ज्येष्ठता सूची कारागृह विभागाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात यावी तसेच सर्व कार्यालयाना ई-मेल व्दारे पाठविण्यात येऊन अहवाल कक्ष क्रमांक-२ (कार्यकारी आस्थापना) कक्षास देण्यात यावा.